# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे सप्टेंबर २०११

## गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष — ३, गु.अ.वि., मुंबई
## ताडदेव पो ठाणे गु.र.क्र. ४४/११ कलम ३०२,२०१ भादवि

१) गु.र.क्र व कलम — ताडदेव पो ठाणे ४४/११ कलम ३०२, २०१ भादवि

२) गु.घ.दि व वेळ — दिनाक ०४.०३.२०११ पूर्वी

३) गु.दा.दि. व वेळ — दिनांक ०४.०३.२०११ रोजी १५.३० वा

४) गुन्हा उघडकीस — दिनांक ०३.०९.२०११ रोजी

५) फिर्यादी — अमोल अशोक मिसाळ, वय ३३ वर्षे
पोउनि ताडदेव पोलीस ठाणे,

६) बळीत — **मयत** दिंगबर उर्फ दिघो रामचंद्र माजी वय २६ वर्षे,
रा.ठि. गांव बडाबंकी, पो. थाना तुरेकेला,
जिल्हा— बालंगीर ओरीसा राज्य

आरोपी अटक — १) घनश्याम केसरी राणा, वय २७ वर्षे
२) देवधन बालामत राणा वय २२ वर्षे,
३) धनसिंग उर्फ हाडून दमुडा राणा वय २४ वर्षे
४) अनिल खेदू राणा वय २३ वर्षे

**गुन्हयाची हकिगत** — दिनांक ०४.०३.२०११ रोजी श्री. संजय वराडे, उप अभियंता म्हाडा यांना ताडदेव पोलीस ठाणे हददीतील मणियार बिल्डीग, बी—१, च्या टेरेसवरील वापरात नसलेल्या पाण्याचे टाकीत एक मानवी हाडांचा सांगाडा मिळून आला म्हणून ताडदेव पोलीस ठाणेचे पो.उ.नि. श्री. अमोल मिसाळ यांची सरकार तर्फे फिर्यादी दाखल केली.

गुन्हे प्रकटीकरण शाखेचे व.पो.नि. मर्दे व पथक यांनी घटनास्थळास भेट देवून गुन्हयाचा समांतर तपास सुरु केला. सदर तपास पथकास अशी माहिती मिळाली की, सन २००८ मध्ये मणियार बिल्डीगचे म्हाडातर्फे दुरुस्तीचे काम चालू होते. त्यावेळी काम करणारे कामगार अचानक काम सोडून निघून गेल्याची माहिती चौकशीत निष्पन्न झाल्याने तो धागा पकडून प्रथम नाका कामगार, ठेकेदार याचे मार्फत माहिती मिळाली की, दुरुस्तीकाम करणारे कामगार टेरेसवर रहात होते. त्याचे सोबत काम करणारा एक कामगार चेबूर मुंबई येथे असून तो यातील प्रमुख आरोपी घनश्याम याचेशी गावी संर्पकात आहे. तो दुवा पकडून प्रथम आरोपी घनश्याम यास

रायपूर, छत्तीसगड येथून ताब्यात घेतले. त्याचेमार्फत इतर तीन आरोपीतांना ओरीसा राज्यातून पोलीसांनी अत्यंत कौशल्य व सावधगिरीने ताब्यात घेतले आहे.

त्यांनी त्याचेंसमवेत काम करणारा इसम नामे **दिंगबर उर्फ दिघो रामचंद्र माजी वय २६ वर्षे, (यातील मयत)** यास बांबूने व लाथाबुक्याने मारहाण करुन, राहते टेरेसच्या वापरात नसलेल्या पाण्याच्या टाकीत टाकून दिले आणि टाकीचे लोखंडी झाकण तारेने बांधून टाकले त्यांनतर ते अर्धवट काम सोडून भितीने गावाकडे पळून गेले.

मयत व आरोपीत इसम मजूरीचे काम करीत व एकत्रित जेवण खर्च आपसात वर्गणी काढून करीत असत. त्याखर्चास मयत नेहमी हरकत गेत असे त्यातून झालेल्या भांडणात सदरचा गुन्हा घडला आहे.

गुन्हयाचा कोणतीही दुवा नसताना सापडलेला मानवी हाडांचा सापळा आणि कालावधी लक्षात घेता सदर गुन्हा उघडकीस येणे अशक्यप्राय होते. त्याच मुदयांचा सुसंगत पणे मेळ घालून ुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष – ३ चे खालील नमुद पथकाने गुन्हे तपासाचा व्यवसायीक कस लावून सदरचा क्लिष्ट गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा.पोलीस आयुक्तांनी** त्यांना **सप्टेंबर २०११** चे **बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ठ गुन्हेशोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

<u>तपास पथकातील अधिकारी व अंमलदार</u>

१) वपोनि प्रशांत मर्दे / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
२) पोनि मनोहर धनावडे / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
३) पोनि संजय निकुंबे / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
४) पोउनि सुदेश आजगावकर / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
५) सफौ २३४४/वळवी / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
६) पोशि ३३२४०/फापाळे / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
७) पोशि ३४५२९/कदम / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
८) पोशि ०१–४२०/सावंत / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
९) पोना २७९३०/कोरे / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
१०) पोशि २९४४७/देसाई / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
११) पोशि ३३२४६/नाईक / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
१२) पोशि ०३–२०८/अनहुले / कक्ष – ३, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई